# Bharatiya Janata Party

C.D.O. Barrack No.1, Opp. Yogekshema, Vasantrao Bhagwat Chowk, Nariman Point, Mumbai 400 020 ● Tel: 22022050

.

**खाजगी वन जमिनी सरकारी गोंधळ की घोटाळा - डॉ.किरीट सोमैया**

**६७,४३८ परिवारांच्या संरक्षणासाठी काहीही नाही**

खाजगी वने घोषित करणा-या यादीतून नविन मोठे प्रकल्प वगळण्याचे काम राज्य सरकारने तत्परतेने सुरु केले आहे. स्थगिती देण्यात आलेल्या अशा मोठया प्रकल्पांचे बांधकाम आता वेगाने मालाड, पोईसर, कांदिवली परिसरात सुरु झाले आहे.

जंगल घोषित झालेल्या जमिनीवर वास्तव्यास असलेली कुटुंब सरकारी मदतीच्या प्रतिक्षेत आहेत. खाजगी वने सरकारी गोंधळ व घोटाळा गेली ३ वर्ष सुरु आहे. ५ ते ५० वर्ष रहिवाशी असलेल्या सुमारे ५ लाख लोकांना अनधिकृत घोषित करण्यात आले. दहिसर ते गोरेगांव व मंडाला-चेंबूर ते मुलुंड पर्यंतच्या अनेक मोठया वस्त्या खाजगी वने घोषित करण्यात आल्या.

सातत्याने पाठपुरावा केल्यानंतरही महाराष्ट्र सरकार, जिल्हाधिकारी कार्यालय या वस्त्या व जमिनींची माहिती देत नाहीत. आता ही अधिकृत माहिती आम्ही वन संरक्षकांकडून मिळविली आहे.

आश्चार्याची बाब म्हणजे भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटरचा जवळ-जवळ पूर्ण प्रकल्प आता 'अनधिकृत' व जंगल घोषित झाला आहे. त्या जमिनीची मालकीही या गोंधळामुळे राज्य सरकारकडे आली. बी.ए.आर.सी., चेंबूर परिसरातील शेकडो इमारतीही अनधिकृत व वन घोषित झाल्या आहेत.

वन घोषित करण्यात आलेल्या या परिसरात शासकीय व महापालिकेचे कोणतेही प्रकल्प, समाज कल्याणाची कामे, नविन रस्ते करण्यावर राज्य सरकारने बंदी घातली आहे.

३ वर्ष आश्वासने दिल्यानंतरही अजुनपर्यंत राज्य सरकारने आपली चूक दुरुस्त करण्यासाठी किंबहूना ५ लाख लोकांना संरक्षण देण्यासाठी काही केले नाही.

# Bharatiya Janata Party

C.D.O. Barrack No.1, Opp. Yogekshema, Vasantrao Bhagwat Chowk, Nariman Point, Mumbai 400 020 ● Tel: 22022050

उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयात सुनावणी चालू असताना राज्य शासनाने वेगवेगळया सबबी व सूट देऊन अनेक प्रकल्प वन मुक्त केले.

- संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाला लागणारी जमिन  घेऊन बाकी वन जमिन मुक्त करणे
- न्यायालय व इतरत्र वेगवेगळी कारणे व निकाल
- वेगवेगळया कारणास्तव न्यायालयाच्या अंतरिम आदेशाचा 'दुरुपयोग'
- १९७५ खाजगी वन कायद्याचा संदर्भ देऊन वन असलेल्या जमिनी मुक्त करणे.

**शासनाने सर्वप्रथम या निर्दोष ५ लाख नागरिकांचे व ६७,४३८ घरांना संरक्षण द्यावे. आवश्यकता असल्यास कायद्यात बदल करावा व नंतरच ''मोठया लोकांच्या मदतीला धावावे" अशी मागणी भाजपा नेते डॉ.किरीट सोमैया यांनी केली आहे.**

प्रसिध्दी सचिव